# मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाची घटना

*(ही घटना २३ ते २९ डिसेंबर १९६८ रोजी कोचिन येथील पक्षाच्या ८व्या कॉंग्रेसने मंजूर केली. एप्रिल २००८च्या कोइंबतूर येथील १९व्या पक्ष कॉंग्रेसपर्यंत केलेल्या घटनेतील दुरुस्त्या आणि डिसेंबर २००५ पर्यंत पक्षाच्या केंद्रीय कमिटीने घटनेखालील नियमांत केलेल्या दुरुस्त्या यांचा समावेश येथे करण्यात आलेला आहे.)*

## कलम १ : नाव

पक्षाचे नाव भारताचा कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) असे राहील.

## कलम २ : ध्येय

भारताचा कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) हे भारताच्या कामगारवर्गाचे क्रांतिकारक अग्रदल आहे. कामगारवर्गाची सर्वाधिकारी सत्ता असलेले शासन स्थापन करून, त्यातून समाजसत्तावादाची व साम्यवादाची उभारणी करणे हे पक्षाचे ध्येय आहे. मार्क्सवाद-लेनिनवादाचे तत्त्वज्ञान आणि सिध्दांत हेच पक्षाला त्याच्या सर्व कार्यात मार्गदर्शक राहतील. कारण, मानवाद्वारा होणाऱ्या मानवाच्या पिळवणुकीचा अंत करण्याचा, श्रमिक जनतेची संपूर्ण मुक्ती करण्याचा अचूक मार्ग तिला दाखविणारे हे एकमेव तत्त्वज्ञान आहे. पक्ष सर्वहारावर्गीय आंतरराष्ट्रीयवादाची पताका उंच फडकवित ठेवतो.

## कलम ३ : झेंडा

रुंदीच्या दीडपट लांब असा लाल झेंडा हा पक्षाचा झेंडा असेल. त्याच्या मध्यभागी पांढऱ्या रंगात परस्पर-छेदक विळा व हातोडा असेल.

## कलम ४ : सभासदत्व

१. पक्षाचा कार्यक्रम व घटना मानण्यास, पक्ष संघटनांपैकी एका संघटनेत काम करण्यास, पक्ष सभासद म्हणून द्यावयाची रक्कम (ठरलेली वर्गणी व लेव्ही) नियमितपणे भरण्यास आणि पक्षाचे निर्णय अंमलात आणण्यास तयार असलेली, भारतात राहणारी, अठरा वर्षे किंवा त्यावरील वयाची कोणतीही व्यक्ती पक्षाची सभासद होण्यास पात्र राहील.

२. अ) दोन पक्ष सभासदांच्या शिफारसीवरून, व्यक्तिगत अर्जावरून, नवे पक्ष सभासद पक्षात दाखल केले जातात. अर्जदाराची शिफारस करणाऱ्या पक्ष सभासदांनी स्वत:च्या माहितीच्या आधारे व जबाबदारीची यथायोग्य जाणीव ठेवून संबंधित पक्ष शाखेला किंवा पक्ष घटकाला अर्जदाराबाबत संपूर्ण माहिती पुरविली पाहिजे. अर्जदाराला पक्षात दाखल करावयाचे असल्यास तशी शिफारस पक्ष शाखेने पुढील वरिष्ठ पक्ष समितीला केली पाहिजे. पुढील वरिष्ठ समिती सर्व शिफारसींवर निर्णय घेईल.

ब) पक्ष शाखेच्या वरच्या व मध्यवर्ती समितीपर्यंतच्या सर्व वरिष्ठ पक्ष समित्यांना पक्षात नवे सभासद दाखल करण्याचा अधिकार आहे.

३. अ) अर्ज करण्याच्या व शिफारसीच्या दिवसापासून एक महिन्याच्या आत पक्ष सभासदत्त्वाचे सर्व अर्ज योग्य त्या पक्ष समितीपुढे ठेवलेच पाहिजेत.

ब) अर्जदाराला पक्षात दाखल करून घेतल्यास त्याला किंवा तिला पक्ष प्रवेशाच्या तारखेपासून एक वर्षापर्यंत उमेदवार सभासद म्हणून मानले जाईल.

४. अन्य पक्षाचा स्थानिक, जिल्हा किंवा राज्य पातळीवरचा प्रमुख सभासद पक्षाकडे आला, तर त्याला किंवा तिला पक्ष सभासद म्हणून दाखल करून घेण्यापूर्वी स्थानिक, जिल्हा वा राज्य समित्यांच्या मंजुरीच्या भरीला, संबंधित पक्ष समितीच्या पुढील वरिष्ठ पक्ष समितीची मंजुरी घेणे आवश्यक आहे. काही अपवादात्मक प्रकरणांत, मध्यवर्ती समिती अथवा राज्य समिती अशा सदस्यांना पक्षाचे संपूर्ण सभासदत्व देऊ शकते. अशा सदस्यांना प्रवेश देताना राज्य समितीने मध्यवर्ती समितीची पूर्व परवानगी घेतली पाहिजे.

५. एकदा पक्षातून काढलेल्या पक्ष सभासदांना पुन: पक्षात प्रवेश देणे हे त्यांना पक्षातून काढण्यावर शिक्कामोर्तब केलेल्या पक्ष समितीच्या किंवा तिच्या वरील पक्ष समितीच्या निर्णयावरूनच शक्य होईल.

६. निवडण्याचा किंवा निवडून जाण्याचा किंवा कोणत्याही प्रस्तावावर मत देण्याचा हक्क वगळला तर पूर्ण सभासदत्वाची इतर सर्व कर्तव्ये व हक्क उमेदवार सभासदांना लागू आहेत.

७. पक्षाचा कार्यक्रम, घटना व प्रचलित धोरणे यांबाबत उमेदवार सभासदांना प्राथमिक शिक्षण देण्याची व्यवस्था, त्यांना दाखल करण्याची शिफारस



करणारी पक्ष शाखा किंवा दाखल करणारी पक्ष समिती करील आणि एखाद्या पक्ष शाखेचे वा घटकाचे सभासद म्हणून त्यांना कार्यान्वित करण्याची व्यवस्था करून त्यांच्या विकासाचे निरीक्षण करील.

८. उमेदवारीची मुदत संपण्याच्या सुमारास, संबंधित पक्ष शाखा वा समिती, उमेदवार सभासद पूर्ण सभासद म्हणून प्रवेश देण्यास पात्र आहे किंवा नाही यावर चर्चा करील. उमेदवार सभासद अपात्र ठरल्यास पक्ष शाखा वा समिती त्याचे किंवा तिचे उमेदवार सभासदत्त्व रद्द करील. संबंधित शाखा किंवा पक्ष समिती संपूर्ण सभासद म्हणून प्रवेश दिलेल्यांच्या बाबतचा अहवाल पुढील वरिष्ठ पक्ष समितीला नियमितपणे पाठवील.

९. या अहवालाची छाननी केल्यावर, वरिष्ठ समिती, तो सादर करणाऱ्या पक्ष शाखा वा समितीबरोबर विचारविनिमय करून, त्यातील निर्णयात फेरफार वा दुरुस्ती करू शकेल. जिल्हा व राज्य समिती उमेदवारांच्या नोंदणीवर व त्यांना पूर्ण सभासद म्हणून प्रवेश देण्यावर देखरेख करण्याच्या आपल्या अधिकाराचा उपयोग करतील. कनिष्ठ समित्यांचा या बाबतचा निर्णय दुरुस्त करण्याचा वा फेटाळण्याचा त्यांना हक्क आहे.

१०. पक्ष सभासदाला आपले सभासदत्व एका घटकातून दुसऱ्या घटकात बदलता येईल. मात्र त्यासाठी त्याच्या वा तिच्या घटकाची संमती घेतली पाहिजे व त्याच्यामार्फत ज्या वरिष्ठ घटकाच्या अधिकारक्षेत्रात हे संबंधित घटक काम करीत असतील त्यांकडे त्याने किंवा तिने आपल्या घटकामार्फत अर्ज केला पाहिजे.

## कलम ५ : पक्ष प्रतिज्ञा

पक्षात दाखल होणारी प्रत्येक व्यक्ती पक्ष प्रतिज्ञेवर सही करील. प्रतिज्ञा पुढीलप्रमाणे असेल :

''मी पक्षाचे ध्येय आणि उद्दिष्टे शिरोधार्य मानतो व त्याच्या घटनेचे पालन करण्याचे व त्याचे निर्णय एकनिष्ठपणे पार पाडण्याचे मान्य करतो.''

''मी कम्युनिझमच्या आदर्शांना उचित असे जीवन जगण्याची पराकाष्ठा करीन आणि पक्षाच्या व जनतेच्या हितापुढे स्वत:चे हित गौण लेखून कामगारवर्गाची, श्रमिक जनतेची व देशाची नि:स्वार्थपणे सेवा करीन.''

## कलम ६ : पक्ष सभासदत्वाचे रेकॉर्ड्स

पक्ष सभासदत्वाची सर्व कागदपत्रे जिल्हा समितीच्या देखरेखीखाली ठेवण्यात येतील.

## कलम ७ : पक्ष सभासदत्वाची तपासणी

१. पक्ष सभासद ज्या पक्ष संघटनेचा सभासद असेल, तिच्याकडून दरवर्षी पक्ष सभासदत्वाची तपासणी केली जाईल. एखादा पक्ष सभासद सतत काही काळ आणि योग्य कारण न देता पक्षाच्या जीवनात व कार्यात भाग घेण्यास किंवा पक्षाची वर्गणी-लेव्ही भरण्यास चुकला असेल तर त्याला पक्ष सभासदत्वातून गाळले जाईल.

२. संबंधित शाखा वा पक्ष समितीने केलेल्या पक्ष सभासदांच्या तपासणीचा अहवाल शिक्कामोर्तब व नोंद करण्यासाठी पुढील वरिष्ठ समितीकडे पाठविला जाईल.

३. पक्ष सभासदत्वातून गाळण्याच्या निर्णयांवर अपील करण्याचा अधिकार असेल.

## कलम ८ : पक्ष सभासदत्वाचा राजीनामा

१. पक्षाचा राजीनामा देऊ इच्छिणारा वा इच्छिणारी पक्ष सभासद, ज्या पक्ष शाखेत वा घटकात तो वा ती असेल त्यास आपला राजीनामा सादर करील. संबंधित घटक, वाटल्यास तो राजीनामा स्वीकारील व त्याचे वा तिचे नाव पटावरून काढून टाकील व ही घटना पुढील वरिष्ठ समितीला कळवील. हा राजीनामा राजकीय कारणांसाठी दिलेला असल्यास तो घटक त्याचा स्वीकार करण्यास नकार देऊ शकेल व त्या सभासदाची पक्षातून हकालपट्टी करू शकेल.

२. पक्षाचा राजीनामा देऊ इच्छिणाऱ्या पक्ष सभासदावर, त्याची वा तिची पक्षातून हकालपट्टी करण्याइतक्या गंभीर स्वरूपाचा पक्ष शिस्तभंगाचा आरोप येण्याची शक्यता असली आणि हा आरोप भरीव स्वरूपाचा असला तर राजीनाम्याची अंमलबजावणी पक्षातून हकालपट्टी म्हणून करता येईल.

३. पक्षातून हकालपट्टी म्हणून अंमलात आलेल्या राजीनाम्यांची अशी सर्व



प्रकरणे पुढील वरिष्ठ पक्ष समितीला तत्काळ कळवलीच पाहिजेत व त्या समितीची मंजुरी मिळाल्यावरच ती अंमलात येतील.

## कलम ९ : सभासदत्वाची वर्गणी

१. सर्व पक्ष सभासद, त्याचप्रमाणे उमेदवार, सालिना दोन रुपये पक्ष सभासदत्वाची वर्गणी भरतील. पक्ष प्रवेशाच्या वेळी आणि दरवर्षी मार्च महिना संपण्यापूर्वी, संबंधित पक्ष सभासद आपल्या पक्ष शाखेच्या किंवा घटकाच्या सचिवाकडे ही वार्षिक पक्ष वर्गणी भरील. योग्य मुदतीत त्याने किंवा तिने ही वर्गणी भरली नाही, तर त्याचे किंवा तिचे नाव पक्षाच्या पटावरून काढून टाकले जाईल. परिस्थितीमुळे या मुदतीत वाढ करणे आवश्यक असल्यास मध्यवर्ती समिती ही तारीख वाढवून देईल.

२. पक्ष शाखा किंवा घटकांनी पक्ष सभासदांकडून जमवलेली सर्व वर्गणी योग्य त्या पक्ष समित्यांमार्फत मध्यवर्ती समितीला भरली जाईल.

## कलम १० : पक्ष लेव्ही

प्रत्येक पक्ष सभासदाने, मध्यवर्ती समिती ठरवील त्याप्रमाणे मासिक लेव्ही भरलीच पाहिजे. ज्यांचे उत्पन्न वार्षिक वा मोसमी स्वरूपाचे असेल, त्यांनी आपली लेव्ही मोसमाच्या किंवा दर तिमाहीच्या सुरुवातीला त्या त्या टक्केवारीच्या नुसार भरलीच पाहिजे. पक्ष लेव्ही भरावयाच्या वेळेनंतर तीन महिन्यांच्या आत एखादा सभासद ती भरण्यास चुकला/चुकली तर त्याचे/तिचे नाव पक्षाच्या पटावरून काढून टाकले जाईल.

## कलम ११ : पक्ष सभासदांची कर्तव्ये

१. पक्ष सभासदांची कर्तव्ये पुढीलप्रमाणे आहेत:

अ) आपण सभासद असलेल्या पक्ष संघटनेच्या कार्यात नियमितपणे भाग घेणे आणि पक्षाचे धोरण, निर्णय व आदेश यांची इमानेइतबारे अंमलबजावणी करणे;

ब) मार्क्सवाद-लेनिनवादाचा अभ्यास करणे व आपल्या आकलनाची पातळी उंचावण्याचा प्रयत्न करणे;

क) पक्षाची वृत्तपत्रे व वाङ्मय वाचणे, त्यांचा पुरस्कार करणे व ती

लोकांमध्ये पोचवणे;

ड) पक्षाची घटना व शिस्त पाळणे आणि सर्वहारावर्गीय आंतरराष्ट्रीयवादाच्या बाण्याला व साम्यवादाच्या भव्योदात्त आदर्शांना अनुसरून वागणे;

इ) स्वत:च्या हितसंबंधांपेक्षा जनतेच्या व पक्षाच्या हितसंबंधांना श्रेष्ठ मानणे;

फ) जनतेची मनोभावे सेवा करणे, तिच्याबरोबरचे अनुबंध सतत दृढतर करणे, जनतेपासून शिकणे, तिची मते व मागण्या पक्षाच्या कानावर घालणे; सूट मिळालेली नसल्यास, कोणत्या तरी जनसंघटनेत पक्षाच्या मार्गदर्शनानुसार काम करणे;

ग) परस्परांत बंधुभावाचे संबंध निर्माण करणे आणि पक्षात भ्रातृभावनेची निरंतर जोपासना करणे;

ह) एकमेकांस सहाय्यभूत होण्याकरता आणि व्यक्तिगत व सामुदायिक कार्य सुधारण्याकरता टीकेचा व आत्मटीकेचा अवलंब करणे;

ई) पक्षाशी निर्भीड, प्रामाणिक व सत्यवचनी असणे आणि पक्षाच्या विश्वासाशी द्रोह न करणे;

ज) पक्षाच्या ऐक्याचे व एकजुटीचे संरक्षण करणे आणि कामगारवर्गाच्या व देशाच्या शत्रूंविरुद्ध जागरूक राहणे;

ख) पक्षाचे रक्षण करणे आणि पक्षाच्या, कामगारवर्गाच्या व देशाच्या शत्रूंच्या हल्ल्यांविरुद्ध पक्ष ध्येयाचे जतन करणे.

२. वरील कर्तव्ये पक्ष सभासदांकडून पार पाडली जाण्याची निश्चिती निर्माण करणे व ती पार पाडण्यास त्यांना हरतऱ्हेने सहाय्य करणे हे पक्ष संघटनेचे कार्य असेल.

## कलम १२ : पक्ष सभासदांचे हक्क

१. पक्ष सभासदांचे हक्क पुढीलप्रमाणे आहेत:

अ) पक्षाच्या कार्यकारी संस्थांची व पक्ष समित्यांची निवड करणे व त्यांत निवडले जाणे;

ब) पक्षाचे धोरण व निर्णय ठरवण्यासाठी होणाऱ्या चर्चेत भाग घेऊन



त्यात आपले योगदान करणे;

क) पक्षातील स्वत:च्या कार्याबाबत सूचना करणे;

ड) पक्ष बैठकांमध्ये पक्ष समित्या व पक्षाधिकारी यांच्यावर टीका करणे;

इ) आपला पक्ष घटक त्याच्या किंवा तिच्याविरुध्द शिस्तभंगाच्या कारवाईची चर्चा करीत असताना त्याच्यासमोर जातीने आपले म्हणणे मांडणे.

फ) पक्ष समितीच्या संघटनेसंबंधीच्या निर्णयाशी कोणी पक्ष सभासद असहमत असल्यास, त्याला वा तिला आपले मत पुढील वरिष्ठ समितीपुढे मांडण्याचा हक्क आहे. राजकीय मतभेदाच्या प्रकरणी, मध्यवर्ती समितीपर्यंतच्या वरिष्ठ समितीपुढे आपले मत मांडण्याचा सभासदाला हक्क आहे. अर्थातच, अशा सर्व प्रकरणी, पक्ष सभासद पक्षाचे निर्णय पार पाडीत राहील आणि मतभेदांची सोडवणूक व्यवहाराच्या कसोटीवर व बंधुभावात्मक चर्चेद्वारा करण्याचा प्रयत्न केला जाईल;

ग) कोणतेही निवेदन, अपील वा तक्रार, मध्यवर्ती समितीपर्यंतच्या व तिच्यासह कोणत्याही वरिष्ठ संघटनेकडे पाठवणे.

२. ह्या हक्कांचा आदर करणे हे पक्ष संघटनेचे आणि पक्षाधिकाऱ्यांचे कर्तव्य असेल.

## कलम १३ : लोकशाही मध्यवर्तित्वाची तत्त्वे

१. पक्षरचना लोकशाही मध्यवर्तित्वाच्या तत्त्वांवर आधारलेली आहे व त्या तत्वांनीच पक्षांतर्गत जीवनाचे मार्गदर्शन केले जाते. लोकशाही मध्यवर्तित्व म्हणजे पक्षांतर्गत लोकशाहीवर आधारलेले मध्यवर्ती नेतृत्व आणि मध्यवर्ती नेतृत्वाच्या मार्गदर्शनाखालील पक्षांतर्गत लोकशाही होय.

पक्षरचनेच्या क्षेत्रात लोकशाही मध्यवर्तित्वाची मार्गदर्शक तत्त्वे अशी आहेत :

अ) वरपासून खालपर्यंत पक्षाच्या सर्व कार्यकारी संस्था निवडलेल्या असतील.

ब) अल्पमतवाले बहुमताच्या निर्णयांची अंमलबजावणी करतील. कनिष्ठ पक्ष संघटना पक्षाच्या वरिष्ठ कार्यकारी संस्थांचे निर्णय व आदेश अंमलात आणतील. व्यक्ती सामुदायिक इच्छाशक्तीला प्रमाण मानील. सर्व पक्ष संघटना

पक्ष काँग्रेसच्या व मध्यवर्ती समितीच्या निर्णयांची व आदेशांची अंमलबजावणी करतील.

क) सर्व पक्ष समित्या वेळोवेळी आपल्या कार्याचा अहवाल त्यांच्या लगतच्या कनिष्ठ पक्ष संघटनांपुढे, तसेच सर्व कनिष्ठ समित्या आपला अहवाल लगतच्या वरिष्ठ समित्यांपुढे मांडतील.

ड) सर्व पक्ष समित्या, विशेषत: नेतृत्वदायी पक्ष समित्या, कनिष्ठ पक्ष संघटनांच्या व सर्वसाधारण पक्ष सभासदांच्या मतांकडे व टीकेकडे सतत लक्ष पुरवतील.

इ) सामुदायिक निर्णय आणि त्यांची तपासणी व त्याच्या जोडीला व्यक्तिगत जबाबदारी, ह्या तत्त्वांनुसार सर्व पक्ष समित्या कटाक्षाने कार्य करतील.

फ) आंतरराष्ट्रीय घडामोडींचे सर्व प्रश्न, अखिल भारतीय स्वरूपाचे प्रश्न, किंवा एकापेक्षा जास्त राज्यांना लागू असलेले प्रश्न, वा ज्यांत सबंध देशाला समान अशा निर्णयांची जरूरी आहे असे प्रश्न, यांचा निर्णय अखिल भारतीय पक्ष संघटना करतील. राज्यव्यापी वा जिल्हाव्यापी स्वरूपाच्या सर्व प्रश्नांचा निर्णय सर्वसाधारणत: त्या त्या स्तरावरील पक्ष संघटना करतील. परंतु कुठल्याही बाबतीत असे निर्णय वरिष्ठ पक्ष संघटनेच्या निर्णयांविरुद्ध घेतले जाऊ शकणार नाहीत. राज्यस्तरावरील कोणत्याही महत्त्वाच्या प्रश्नावर मध्यवर्ती पक्ष नेतृत्वाला निर्णय घ्यावयाचा असेल, तेव्हा सामान्यत: त्याने संबंधित राज्य पक्ष संघटनेशी सल्लामसलत केली पाहिजे. राज्य संघटनेने जिल्ह्यांच्या संबंधात असेच केले पाहिजे.

ग) अखिल-भारतीय स्तरावर पक्ष धोरणावर परिणाम करणाऱ्या ज्या प्रश्नांवर पक्षाची भूमिका प्रथमच व्यक्त करावयाची आहे, तेथे पक्षाच्या मध्यवर्ती नेतृत्वालाच धोरणात्मक निवेदन करण्याचा अधिकार असेल. मध्यवर्ती नेतृत्वाच्या विचारासाठी कनिष्ठ समित्यांनी आपली मते व सूचना योग्य वेळेत पाठविली पाहिजेत.

२. सर्व पक्ष सभासदांच्या व जनआंदोलनांच्या अनुभवाचा आधार घेऊन पक्षांतर्गत जीवनाच्या क्षेत्रात लोकशाही मध्यवर्तित्वाची खालील मार्गदर्शक तत्त्वे लागू केली जातात :



अ) पक्षावर, त्याच्या धोरणावर व कार्यावर परिणाम करणाऱ्या सर्व प्रश्नांवर पक्ष घटकांमध्ये मोकळी आणि निर्भीड चर्चा;

ब) पक्षाची धोरणे लोकप्रिय करण्यात व ती अंमलात आणण्यात पक्ष सभासदांना क्रियाशील करण्याचे, त्यांना पक्षाच्या जीवनात व कार्यात परिणामकारकरित्या भाग घेता यावा म्हणून त्यांची वैचारिक-राजकीय पातळी उन्नत करण्याचे व त्यांच्या सर्वसाधारण शिक्षणात सुधारणा करण्याचे अविरत प्रयत्न;

क) जेव्हा एखाद्या पक्ष समितीत गंभीर मतभेद उद्‌भवतात, तेव्हा मतैक्य करण्याचे एकूणएक प्रयत्न करावे. हे साध्य न झाल्यास आणि पक्ष व जनआंदोलनाकरता ताबडतोब निर्णय घेण्याची निकड नसल्यास, आणखी चर्चा करून मतभेद सोडवण्याकरता निर्णय तहकूब करावा;

ड) सर्व स्तरांवर, वरपासून खालपर्यंत, टीकेला व आत्मटीकेला, विशेषत: खालून होणाऱ्या टीकेला उत्तेजन;

इ) सर्व पातळ्यांवर नोकरशाही प्रवृत्तींविरुद्ध सातत्याचा संघर्ष;

फ) पक्षात कोणत्याही स्वरूपात गटबाजी व गटबाज संघटना करण्याला बंदी;

ग) बंधुभावाचे संबंध व परस्पर सहाय्य यांचा विकास करणे, कॉम्रेड्सना सहानुभूतीने वागवून त्यांच्या चुका सुधारणे, एकट्यादुकट्या चुका वा घटनांच्या आधारे नव्हे, तर त्यांच्या पक्ष सेवेचा समग्र इतिहास विचारात घेऊन त्यांच्याबद्दलचे निदान करणे, या मार्गाने पक्ष बाणा दृढतर करणे.

## कलम १४ : अखिल भारतीय पक्ष काँग्रेस

१. अखिल भारतीय पक्ष काँग्रेस ही सबंध देशाकरता पक्षाची सर्वोच्च संस्था असेल.

अ) मध्यवर्ती समिती नियमित पक्ष काँग्रेस सामान्यत: तीन वर्षांतून एकदा भरवील.

ब) असाधारण पक्ष काँग्रेस मध्यवर्ती समितीला योग्य वाटेल तेव्हा, किंवा एकूण पक्ष सभासदसंख्येच्या तिसऱ्या हिश्श्यापेक्षा कमी नाही अशा पक्ष

सभासदसंख्येचे प्रतिनिधित्व करणाऱ्या दोन किंवा अधिक राज्य समित्यांनी मागणी केली तर, भरवील.

क) पक्ष काँग्रेसची किंवा असाधारण पक्ष काँग्रेसची तारीख आणि जागा ही त्याकरता खास बोलावलेल्या बैठकीत मध्यवर्ती समिती ठरवील.

ड) नियमित पक्ष काँग्रेस ही राज्य परिषदांनी व अखिल भारतीय पक्ष केंद्राखाली असलेल्या पक्ष घटकांच्या परिषदांनी निवडलेल्या प्रतिनिधींची बनलेली असेल.

इ) नियमित पक्ष काँग्रेसच्या प्रतिनिधित्वाचा पाया आणि असाधारण पक्ष काँग्रेसच्या प्रतिनिधित्वाचा पाया व प्रतिनिधी निवडण्याची पद्धत ही त्या त्या राज्यातील एकूण पक्ष सभासदसंख्या, पक्षाच्या नेतृत्वाखालील जनआंदोलनांचे बळ व पक्षाची ताकद यांच्या आधारावर मध्यवर्ती समिती ठरवील.

फ) पक्ष काँग्रेस नियमित असो वा असाधारण, तिच्यात मध्यवर्ती समितीच्या सभासदांना पूर्ण प्रतिनिधी म्हणून भाग घ्यावयाचा हक्क असेल.

२. नियमित पक्ष काँग्रेसची कार्ये आणि अधिकार पुढीलप्रमाणे असतात:

अ) मध्यवर्ती समितीच्या राजकीय व संघटनात्मक अहवालावर चर्चा व कृती करणे.

ब) पक्षाचा कार्यक्रम व घटना यांत दुरुस्ती व बदल करणे.

क) प्रचलित परिस्थितीबाबत पक्षाचे धोरण ठरविणे.

ड) गुप्त मतदान पद्धतीने मध्यवर्ती समिती निवडणे.

३. पक्ष काँग्रेस क्रेडेंशियल समिती निवडते. ही समिती सर्व प्रतिनिधींची क्रेडेंशियल्स (अर्हता) तपासून त्यासंबंधीचा आपला अहवाल पक्ष काँग्रेसला सादर करते.

४. पक्ष काँग्रेस आपले कामकाज चालविण्यासाठी एक अध्यक्षमंडळ निवडते.

## कलम १५ : मध्यवर्ती समिती

१. अ) पक्ष काँग्रेस मध्यवर्ती समितीची निवड करील व तिची सभासदसंख्या ठरवील.



ब) मावळती मध्यवर्ती समिती पक्ष काँग्रेसला उमेदवारांची यादी सुचवील.

क) सामान्य जनतेशी निकटचे संबंध असलेले, कामगारवर्गाच्या क्रांतिकारक दृष्टिकोनात खंबीर असलेले व मार्क्सवाद-लेनिनवादात शिक्षित असलेले कार्यक्षम नेतृत्व निर्माण करणे या उद्देशाने उमेदवारांची यादी तयार केली जाईल.

ड) सुचविलेल्या यादीतल्या कोणत्याही नावाला कोणताही प्रतिनिधी हरकत घेऊ शकतो; त्याचप्रमाणे कोणतेही नवे नाव किंवा नवी नावे सुचवू शकतो. पण ज्याचे नाव सुचविले जाते त्याची अगोदर संमती घेणे आवश्यक असते.

इ) ज्याचे नाव सुचविले गेले असेल, त्याला आपले नाव मागे घेण्याचा हक्क असेल.

फ) मांडण्यात आलेली यादी, प्रतिनिधींनी सुचविलेल्या ज्यादा नावांसकट, एका उमेदवाराला फक्त एकच मत व गुप्त मतदान या पद्धतीने मताला टाकली जाईल. प्रतिनिधींनी ज्यादा नावे सुचविली नसली, तर हात वर करायला सांगून प्रतिनिधींची संमती घेतली जाईल.

२. दोन अखिल भारतीय पक्ष काँग्रेसच्या दरम्यानच्या काळात मध्यवर्ती समिती ही पक्षाची सर्वोच्च अधिकारी संस्था असेल.

३. पक्ष घटनेची अंमलबजावणी करण्यास व पक्ष काँग्रेसने स्वीकृत केलेले राजकीय धोरण व निर्णय पार पाडण्यास मध्यवर्ती समिती जबाबदार असेल.

४. मध्यवर्ती समिती ही सबंध पक्षाचे प्रतिनिधित्व करील व पक्षाच्या समग्र कार्याचे मार्गदर्शन करण्याला जबाबदार राहील. पक्षापुढच्या कोणत्याही प्रश्नावर संपूर्ण अधिकाराने निर्णय घ्यायचा हक्क मध्यवर्ती समितीला असेल.

५. मध्यवर्ती समिती आपल्या सदस्यांमधून सरचिटणीसासह एक पॉलिटब्यूरो (राजकीय मंडळ) निवडील. त्याची सदस्यसंख्या मध्यवर्ती समिती ठरवील. मध्यवर्ती समितीच्या दोन सभांच्या दरम्यानच्या काळात पॉलिटब्यूरो मध्यवर्ती समितीचे काम चालवील आणि या काळात राजकीय आणि संघटनात्मक निर्णय घेण्याचा त्याला हक्क असेल.

५ अ) मध्यवर्ती समिती आपल्या सभासदांमधून एक सचिवमंडळ निवडील. त्याची सदस्यसंख्या मध्यवर्ती समिती ठरवील. पॉलिटब्यूरोच्या मार्गदर्शनाखाली सचिवमंडळ पक्ष केंद्राचे दैनंदिन कामकाज पाहील आणि मध्यवर्ती समितीच्या निर्णयांची अंमलबजावणी करण्यास पॉलिटब्यूरोला मदत करील.

६. राज्य समित्यांचे सचिव आणि राज्यांतल्या पक्ष मुखपत्रांचे संपादक यांच्या निवडीला मध्यवर्ती समितीची मंजुरी आवश्यक राहील.

७. अ) मध्यवर्ती समिती आपल्या कोणत्याही सभासदाला, गंभीर स्वरूपाच्या शिस्तभंगाबद्दल, गैरवर्तन वा पक्षविरोधी कारवायांबद्दल, हजर असलेल्या व मतदान करणाऱ्या सदस्यांपैकी दोनतृतीयांश इतक्या मतांनी आणि कोणत्याही परिस्थितीत मध्यवर्ती समितीच्या एकूण सभासदसंख्येच्या निम्म्यापेक्षा जास्त सदस्यांनी त्याला काढून टाकावे असे मत दिल्यास, मध्यवर्ती समितीतून काढून टाकू शकेल.

ब) मध्यवर्ती समितीतील रिकामी झालेली कोणतीही जागा ती आपल्या एकूण सभासदांच्या साध्या बहुमताने भरू शकेल.

क) मध्यवर्ती समितीचे एक किंवा अनेक सदस्य अटक झाले, तर उर्वरित सदस्य बदली सदस्य स्वीकृत करू शकतील. बदली सभासदांना मूळ सभासदांइतकेच पूर्ण हक्क असतील. मात्र, अटक झालेले सभासद जसजसे सुटत जाऊन आपले कार्य सुरू करतील, तसतसे बदली सभासद आपल्या जागा खाली करतील.

८. मध्यवर्ती समितीच्या दोन बैठकांमधील काळ सामान्यत: तीन महिन्यांपेक्षा जास्त नसेल आणि जेव्हा जेव्हा एकूण सभासदांच्या एक-तृतीयांश एवढे सभासद बैठक भरवण्याची लेखी मागणी करतील तेव्हा तेव्हा ती भरेल.

९. मध्यवर्ती समिती राजकीय व संघटनात्मक प्रश्नांवर आणि जनआंदोलनांच्या समस्यांवर चर्चा करील व निर्णय घेईल आणि राज्य समित्यांना व जनसंघटनांमधल्या अखिल भारतीय पक्ष फ्रॅक्शन्सना मार्गदर्शन करील.

१०. मध्यवर्ती समिती ही पक्षाच्या निधीबाबत जबाबदार असेल व पॉलिटब्यूरोने तिला सादर केलेले हिशेबपत्रक वर्षातून एकदा स्वीकृत करील.



११. पक्ष काँग्रेस जेव्हा भरेल तेव्हा तिच्यापुढे मध्यवर्ती समिती आपला राजकीय व संघटनात्मक अहवाल सादर करील.

१२. पक्षाचे क्रांतिकारक नेतृत्व सुदृढ व्हावे आणि राज्य व जिल्हा संघटनांची तपासणी व्हावी, या उद्देशाने मध्यवर्ती समिती आपले प्रतिनिधी व संघटक पाठवते; मध्यवर्ती समितीने अगर पॉलिटब्यूरोने प्रत्येक वेळी तयार केलेल्या खास सूचनांच्या आधारेच त्यांनी आपले काम केले पाहिजे.

१३. मध्यवर्ती समितीला आवश्यक वाटेल तेव्हा ती मध्यवर्ती समितीची विस्तारित सभा किंवा प्लेनम किंवा परिषद बोलावील. अशा संस्थांतील उपस्थितीचा पाया व प्रतिनिधी निवडण्याची पद्धत मध्यवर्ती समिती ठरवील.

१४. आणीबाणीची स्थिती निर्माण झाली किंवा मोठ्या प्रमाणावर धरपकड झाली, तर मध्यवर्ती समिती, राज्य समित्या व जिल्हा समित्या यांची अधिक लहान, सुटसुटीत संस्थांच्या स्वरूपात पुनर्घटना केली जाईल. मध्यवर्ती समितीच्या अशा पुनर्घटनेसाठी पॉलिटब्यूरोचे उरलेले सभासद नावे तयार करतील आणि मध्यवर्ती समितीच्या आतील आणि बाहेरील सभासदांची त्यांना संमती घेतली जाईल. राज्य आणि जिल्हा समित्यांच्या पुनर्घटनेसाठी त्या त्या समित्यांचे उरलेले सभासद नावे तयार करतील व त्यांच्या पुढील वरिष्ठ समितीची त्याला संमती घ्यावी लागेल. आवश्यक वाटले तर त्यांना आपले कार्य आणि जबाबदारी पार पाडण्यासाठी उपसमित्या बनवता येतील. पुनर्घटित मध्यवर्ती समितीला पक्ष संघटनेचे रक्षण करण्याकरता नवे नियम बनविण्याचा अधिकार आहे. परंतु परिस्थिती नित्यावस्थेला येते तेव्हा निवडलेल्या समित्या पुन: स्थापित केल्या जातात.

## कलम १६ : राज्य आणि जिल्हा कार्यकारी संस्था

१. राज्य वा जिल्हा यांमध्ये पक्षाची सर्वोच्च संस्था राज्य वा जिल्हा परिषद ही असून ती राज्य वा जिल्हा समितीची निवड करते.

२. अ) पक्षाच्या राज्य वा जिल्हा कार्यकारी संस्थांची संघटनात्मक रचना, त्यांचे हक्क व कार्ये ही अखिल भारतीय पातळीवरील पक्षरचना व कार्ये यांचा समावेश ज्या कलमांत नमूद केला आहे, त्याप्रमाणेच असतात. मात्र त्यांच्या कार्याची कक्षा, राज्य वा जिल्ह्यापुरतीच सीमित असते, आणि त्यांच्या

निर्णयांचा परीघ निकटच्या वरिष्ठ पक्ष कार्यकारी संस्थेच्या निर्णयांनी मर्यादित झालेला असतो. ह्या पक्ष समित्यांची संख्या वाढवणे आवश्यक झाल्यास निकटच्या वरिष्ठ समितीच्या परवानगीने त्या ती वाढवू शकतात.

ब) राज्य वा जिल्हा समिती सचिवासह आपले सचिवमंडळ निवडेल. परंतु पुढील वरिष्ठ समितीने तशी परवानगी दिली तर राज्य वा जिल्हा समितीचे सचिवमंडळ नसेलही.

क) राज्य वा जिल्हा समिती आपल्या कोणत्याही सभासदाला गंभीर स्वरूपाच्या शिस्तभंगाबद्दल, गैरवर्तन वा पक्षविरोधी कारवायांबद्दल, राज्य समितीच्या वा जिल्हा समितीच्या एकूण सभासदांच्या बहुमताच्या निर्णयाने संबंधित समितीतून काढून टाकील.

३. अ) चळवळीच्या गरजा विचारात घेऊन राज्य समिती जिल्हा समितीचे क्षेत्र ठरवील. प्रशासकीय विभाजनाच्या सीमांमध्ये ते हमखास बसेलच असे नाही.

ब) प्राथमिक घटक (शाखा) आणि जिल्हा वा प्रदेश यांच्यामधील अशा निरनिराळ्या पक्ष संस्थांबाबत राज्य समिती निर्णय घेईल आणि त्यांच्या रचनेबाबत व कामकाजाबाबत आवश्यक त्या तरतूदी करील. मध्यवर्ती समितीने घालून दिलेल्या नियमांना अनुसरूनच हे केले जाईल.

## कलम १७ : प्राथमिक घटक

१. अ) पक्ष शाखा हा पक्षाचा प्राथमिक घटक असून, तो व्यवसाय वा प्रदेशाच्या पायावर संघटित केला जाईल.

ब) कारखान्यात वा संस्थेत वा उद्योगधंद्यात काम करणाऱ्या पक्ष सभासदांना उद्योगधंदा वा व्यवसायाच्या पायावर संघटित केले जाईल. अशा शाखा संघटित केल्यावर त्यांचे सभासद आपल्या निवासस्थानाच्या टापूतील पक्ष शाखांचे सहसभासद असतील, वा तेथे सहाय्यक शाखांमध्ये संघटित असतील. निवासस्थानाच्या टापूत त्यांना दिले जाणारे काम, त्यांचा कारखाना वा संस्था वा व्यवसायाच्या पायाभूत घटकाने नेमलेल्या कामाला नुकसानकारक असता कामा नये.

क) शाखेतील सभासदांची संख्या पंधराहून अधिक असता कामा नये. शाखेची कामे आणि अन्य बाबी राज्य समिती निश्चित करील.



२. शाखा हा तिच्या टापूतील अथवा क्षेत्रातील कामगार, शेतकरी व अन्य जनविभाग आणि पक्षाची मार्गदर्शक समिती यांच्यातला जिवंत दुवा होय. तिची कार्ये अशी आहेत:

अ) वरिष्ठ समितीचे आदेश पार पाडणे.

ब) पक्षाच्या राजकीय व संघटनात्मक निर्णयांच्या बाजूला आपल्या कारखान्यातील अगर टापूतील जनतेला जिंकून घेणे.

क) नवे सभासद म्हणून लढाऊ लोक आणि सहानुभूतीदार यांना पक्षात भरती करता यावे, म्हणून त्यांना आपल्या कार्यात ओढणे व त्यांना राजकीय शिक्षण देणे.

ड) जिल्हा, स्थानिक वा शहर समितीला तिच्या दैनंदिन संघटनात्मक आणि आंदोलनात्मक कार्यात मदत करणे.

३. नित्याचे काम चालविण्यासाठी शाखा आपला सचिव निवडते. त्याला पुढील वरिष्ठ समितीची मंजुरी घेण्यात येते.

## कलम १८ : मध्यवर्ती व राज्य नियंत्रण आयोग

१. मध्यवर्ती नियंत्रण आयोगाची थेट निवड पक्ष काँग्रेस करील. त्याचे सदस्य पाचपेक्षा अधिक असणार नाहीत. मध्यवर्ती नियंत्रण आयोगाचा अध्यक्ष हा मध्यवर्ती समितीचा पदसिद्ध सभासद असेल.

२. नियंत्रण आयोग पुढील कामकाज हाती घेईल:

अ) मध्यवर्ती समिती किंवा पॉलिटब्यूरो यांनी सोपविलेली शिस्तभंगाची प्रकरणे;

ब) राज्य समित्यांनी शिस्तभंगाच्या कारवाया केलेल्या प्रकरणांतील अपीले;

क) पक्षातून हकालपट्टी, संपूर्ण पक्ष सभासदत्वातून निलंबन आणि पक्ष सभासदत्वातून कमी करणे यांविरुद्ध राज्य कमिटी वा राज्य नियंत्रण आयोगाकडे अपील केल्याची व ती फेटाळण्यात आल्याची प्रकरणे.

३. मध्यवर्ती नियंत्रण आयोगाचा निर्णय अंतिम व बंधनकारक राहील. पण असामान्य प्रकरणांत मध्यवर्ती नियंत्रण आयोगाचे निर्णय मध्यवर्ती

समिती राखून ठेवू शकते, त्यांत बदल करू शकते किंवा ते उलटवू शकते. मध्यवर्ती समितीच्या अशा निर्णयास उपस्थित आणि मतदान करणाऱ्या किमान दोन तृतीयांश सदस्यांच्या बहुमताचा पाठिंबा असलाच पाहिजे. अशा सर्व निर्णयांची माहिती पुढील अखिल भारतीय पक्ष काँग्रेसला दिली जाईल.

४. नियंत्रण आयोगाच्या कामकाजाविषयीचे तपशीलवार नियम नियंत्रण आयोगाशी सल्लामसलत करून मध्यवर्ती समिती तयार करील.

५. दोन पक्ष काँग्रेसच्या दरम्यान मध्यवर्ती नियंत्रण आयोगातील एखादी जागा रिकामी झाली, तर ती भरण्याचा अधिकार मध्यवर्ती समितीला असेल.

६. शिस्तभंगाची कारवाई केलेल्या प्रकरणांचा विचार करण्याकरता, राज्य परिषद राज्य नियंत्रण आयोग निवडू शकेल. ज्या कोणत्याही राज्यात असा राज्य नियंत्रण आयोग स्थापन केलेला असेल, तेथे त्याचे कामकाज व अधिकार हे मध्यवर्ती नियंत्रण आयोगाप्रमाणेच, पण त्या राज्याच्या सीमेतच असतील.

## कलम १९ : पक्ष शिस्त

१. पक्षाच्या ऐक्याचे संरक्षण व संवर्धन करण्याकरता, त्याचे सामर्थ्य, संघर्षक्षमता व प्रतिष्ठा वाढविण्याकरता आणि लोकशाही मध्यवर्तित्वाच्या तत्त्वांची अंमलबजावणी करण्याकरता शिस्त अत्यावश्यक आहे. पक्षशिस्तीचा कडकपणे अंगिकार केल्याशिवाय पक्षाला जनतेच्या लढ्यांचे आणि कृतींचे नेतृत्व करता येत नाही, अथवा जनतेबाबतच्या आपल्या जबाबदाऱ्या पार पाडता येत नाहीत.

२. शिस्त ही पक्षाचे ध्येय, कार्यक्रम व धोरणे यांच्या जाणीवपूर्वक स्वीकाराच्या पायावर उभी असते. पक्ष संघटनेतील वा सार्वजनिक जीवनातील स्थान काहीही असो, सर्वांना पक्ष सभासद म्हणून पक्ष शिस्तीचे बंधन सारखेच आहे.

३. पक्ष घटनेचा व निर्णयांचा भंग, त्याचप्रमाणे कम्युनिस्ट पक्षाच्या सभासदाला न शोभणारे एखादे कृत्य व वर्तणूक हा पक्षाचा शिस्तभंग समजला जाऊन, शिस्तभंगाच्या कारवाईला पात्र ठरेल.



४. शिस्तभंगाची कारवाई पुढीलप्रमाणे असते:

अ) इशारा,

ब) निर्भत्सना,

क) जाहीर निर्भत्सना,

ड) पक्षातील पदावरून उचलबांगडी,

इ) एक वर्षापेक्षा जास्त नसेल अशा कोणत्याही मुदतीपर्यंत पक्षाच्या पूर्ण सभासदत्वातून निलंबन,

फ) हकालपट्टी.

५. संबंधित कॉम्रेडचे मन वळवण्यासह अन्य उपाय त्याला सुधारू शकले नाहीत, तरच सर्वसाधारणत: शिस्तभंगाची कारवाई केली जाईल. परंतु शिस्तभंगाची कारवाई केल्यानंतरही त्या कॉम्रेडने स्वत:ला सुधारावे, म्हणून त्याला सहाय्य करण्याचे प्रयत्न चालू राहतील. पक्षाचे हितसंबंध व प्रतिष्ठा यांचे रक्षण करण्याकरता शिस्तभंगाची कारवाई तत्काळ करण्याची निकड असण्याएवढे शिस्तभंगाचे स्वरूप गंभीर असल्यास त्या बाबतीतील कारवाई त्वरेने केली जाईल.

६. पक्षातून हकालपट्टी ही शिस्तभंगाची सगळ्यात कडक कारवाई होय; आणि कमालीची सावधानता, सखोल विचार व सारासार निर्णय यांचा अवलंब करूनच ती केली जाईल.

७. पक्ष सभासदाची हकालपट्टी अथवा पूर्ण सभासदत्वातून निलंबन अथवा पक्षातील पदावरून उचलबांगडी करणारी शिस्तभंगाची कारवाई निकटच्या वरिष्ठ समितीचे शिक्कामोर्तब झाल्याशिवाय अंमलात येणार नाही. हकालपट्टीची शिक्षा झालेल्या पक्ष सभासदाला, शिक्षा कायम होईतोवर, सर्व पक्षकार्यातून दूर केले जाईल. हकालपट्टीच्या शिक्षेवर निकटच्या वरिष्ठ समितीचे शिक्कामोर्तब होईतोवर हकालपट्टीची शिक्षा झालेल्या सभासदाचे पक्ष सभासदत्व निलंबित राहील. वरिष्ठ समितीने आपला निर्णय सहा महिन्यांच्या आत कळवला पाहिजे.

८. ज्या कॉम्रेडवर शिस्तविषयक कारवाई करण्याचे सूचित झाले असेल, त्याला वा तिला, त्याच्या वा तिच्याविरुद्ध असलेल्या आक्षेपांची, आरोपांची व संबंधित गोष्टींची संपूर्ण माहिती दिली जाईल. ज्या पक्ष घटकाचा तो किंवा

ती सभासद असेल, त्याच्यापुढे आपले म्हणणे जातीने मांडण्याचा त्याला वा तिला हक्क असेल आणि जो कोणी अन्य घटक त्याच्यावर वा तिच्यावर कारवाई करणार असेल, त्याला आपली कैफियत सादर करण्याचा त्याला वा तिला हक्क असेल.

९. एखादा सभासद जेव्हा एकाच वेळी दोन पक्ष घटकांचा सभासद असेल, तेव्हा खालच्या घटकाला त्याच्यावर किंवा तिच्यावर शिस्तविषयक कारवाई करण्याची शिफारस करता येईल; पण वरच्या घटकाने ती मान्य केल्याशिवाय ती कारवाई अंमलात येणार नाही.

१०. जे पक्ष सभासद संपफोडे, दारूडे, नैतिकदृष्ट्या अध:पतित, पक्षाच्या विश्वासाला दगा देणारे, गंभीर स्वरूपाचे आर्थिक भ्रष्टाचारी असल्याचे आढळून येईल, त्यांना आरोपपत्र देऊन त्यांचे स्पष्टीकरण येईपर्यंत, ते ज्या घटकाचे सभासद असतील, त्या घटकाला किंवा वरिष्ठ पक्ष संस्थेला, त्यांचे पक्ष सभासदत्व तडाकाफडकी निलंबित करता येईल व पक्षातील जबाबदारीच्या सर्व स्थानांवरून त्यांना दूर करता येईल. असे तडकाफडकीचे निलंबन आणि पक्षातील जबाबदारीच्या स्थानांवरून उचलबांगडी यांचा काळ तीन महिन्यांहून अधिक लांबविता येणार नाही.

११. शिस्तभंगाच्या सर्व कारवायांच्या प्रकरणांमध्ये अपीलाचा हक्क असेल.

१२. ज्या कनिष्ठ समितीकडून पक्ष निर्णयांना व धोरणाला सतत आव्हान दिले गेले असेल, गंभीर स्वरूपाची गटबाजी किंवा पक्ष शिस्तीचा भंग केला गेला असेल, ती समिती बरखास्त करून नवी समिती नेमण्याचा किंवा तिच्याबाबत शिस्तभंगाची कारवाई करण्याचा हक्क मध्यवर्ती समितीला, राज्य वा जिल्हा समितीला आहे. मात्र राज्य व जिल्हा समितीला आपण केलेल्या अशा कारवाईचा अहवाल ताबडतोब पुढील वरिष्ठ समितीला, त्याबाबत आवश्यक वाटेल ती कृती करण्याकरता, सादर करावा लागेल.

१३. अपवादात्मक परिस्थितीत, गंभीर स्वरूपाच्या पक्षविरोधी कारवायांबाबत सभासदांची पक्षातून हकालपट्टी करण्याकरता, पक्ष समित्यांना आपल्या विवेकबुद्धीस अनुसरून झटपट पद्धतीचा अवलंब करता येईल.



## कलम २० : लोकनियुक्त सार्वजनिक संस्थांतील पक्ष सभासद

१. संसद, राज्य विधीमंडळे वा शासकीय मंडळे (ॲडमिनिस्ट्रेटिव्ह कौन्सिल) यांत निवडून गेलेले पक्ष सभासद हे त्या संस्थांत आपला पक्ष गट स्थापन करतील आणि योग्य त्या पक्ष समितीच्या नेतृत्वाखाली पक्ष नीती, धोरणे आणि आदेश यांना काटेकोरपणे अनुसरून कार्य करतील.

२. विधीमंडळांतील कम्युनिस्ट सदस्य जनतेच्या हितसंबंधांचे अविचलितपणे संरक्षण करतील. विधीमंडळांतील त्यांचे कार्य जनआंदोलनांचे प्रतिबिंब असेल आणि पक्ष धोरणांचा पुरस्कार करून ते ती लोकप्रिय करतील.

विधीमंडळांतील कम्युनिस्ट सदस्यांचे संसदीय कार्य हे बाहेरील पक्ष कार्य व जनआंदोलन यांच्याशी निगडित असेल आणि पक्ष बांधणीला व जनसंघटना बांधणीला सहाय्य करणे हे विधीमंडळांच्या सर्व कम्युनिस्ट सदस्यांचे कर्तव्य राहील.

३. विधीमंडळांतील कम्युनिस्ट सदस्य आपल्या मतदारांशी व जनतेशी जास्तीतजास्त निकटचा संबंध ठेवतील, त्यांना आपल्या विधीमंडळांतील कार्याची नियमित माहिती देत राहतील आणि त्यांच्या सूचना व सल्ला घेत राहतील.

४. विधीमंडळांतील कम्युनिस्ट सदस्य व्यक्तिगत सचोटीच्या उच्च आदर्शाचे पालन करतील, साधे जीवन व्यतीत करतील, जनतेबरोबरच्या सर्व संपर्कात व व्यवहारांत विनम्रपणे वागतील आणि पक्षाला स्वत:पेक्षा श्रेष्ठ मानतील.

५. विधीमंडळांतील आणि स्थानिक संस्थांतील कम्युनिस्ट सदस्यांना मिळणारे वेतन आणि भत्ते हा पक्षाचा पैसा मानला जातो. त्या सदस्यांना द्यावयाचे वेतन व भत्ते संबंधित पक्ष समिती ठरवील.

६. महानगरपालिका, नगरपालिका, शहर व विभाग समित्या, जिल्हा परिषदा, पंचायत समित्या व ग्रामपंचायती, यांसारख्या स्थानिक संस्थांत निवडून गेलेले पक्ष सभासद, योग्य त्या पक्ष समितीच्या वा पक्ष शाखेच्या नेतृत्वाखाली काम करतील. ते आपल्या मतदारांशी व जनतेशी दैनंदिन व निकटचे संबंध ठेवतील आणि अशा लोकनियुक्त संस्थांमध्ये त्यांच्या हितसंबंधांचे संरक्षण करतील. मतदार व जनता यांच्यापुढे ते नियमितपणे आपल्या

कार्याचा अहवाल सादर करतील आणि त्यांच्या सूचना व सल्ला घेत राहतील. अशा स्थानिक संस्थांमधील त्यांच्या कार्याची सांगड बाहेरील प्रभावी जनआंदोलनाशी घातली जाईल.

७. संसद, विधीमंडळे अथवा कौन्सिल्स किंवा केंद्रशासित प्रदेशमंडळे यांच्या निवडणुकांसाठी पक्षाचे उमेदवार म्हणून सुचवलेल्या सर्व नावांना मध्यवर्ती समितीची मान्यता मिळविणे आवश्यक आहे.

महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा मंडळे, स्थानिक मंडळे आणि पंचायती, यांच्या निवडणुकांमध्ये पक्ष उमेदवारांची नावे निश्चित करण्याकरता आवश्यक ती नियमावली राज्य समित्या तयार करतील.

## कलम २० अ

भारताचा कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) कायद्याने प्रस्थापित झालेल्या भारताच्या राज्यघटनेवर आणि समाजवाद, धर्मनिरपेक्षता व लोकशाही या तत्त्वांवर आपला नि:शंक दृढविश्वास आणि निष्ठापूर्वक बांधिलकी व्यक्त करतो आणि भारताचे सार्वभौमत्व, ऐक्य व एकात्मतेचे रक्षण करतो.

## कलम २१ : पक्षांतर्गत चर्चा

१. पक्ष ऐक्यबद्ध करण्याकरिता समग्र पक्षाच्या विभिन्न संघटनांत पक्षाच्या धोरणाची मोकळेपणाने व आटोपशीर पद्धतीने चर्चा करणे उपयुक्त व आवश्यक असते. हा पक्ष सभासदाचा पक्षांतर्गत लोकशाहीमधून उद्‌भवणारा अविच्छेद्य हक्क आहे. परंतु पक्ष धोरणासंबंधीच्या प्रश्नांवर पक्षाचे ऐक्य व कृतीची इच्छाशक्ती विकल करणाऱ्या अखंड चर्चा ह्या पक्षांतर्गत लोकशाहीचा गंभीर स्वरूपाचा दुरुपयोग ठरतील.

२. मध्यवर्ती समिती पुढील परिस्थितीत अखिल भारतीय प्रमाणावर पक्षांतर्गत चर्चा संघटित करील :

अ) जेव्हा जेव्हा तिला तसे करणे आवश्यक वाटेल;

ब) जेव्हा जेव्हा पक्ष धोरणाच्या एखाद्या महत्त्वाच्या प्रश्नावर मध्यवर्ती समितीमध्ये पुरेसे भक्कम बहुमत नसेल;

क) जेव्हा एकूण पक्ष सभासदांचा तिसरा हिस्सा असलेल्या सभासदांचे



प्रतिनिधित्व करणाऱ्या राज्य समित्यांनी अखिल भारतीय प्रमाणावर पक्षांतर्गत चर्चेची मागणी केलेली असेल.

३. आपल्या राज्याविषयीच्या एखाद्या महत्त्वाच्या पक्ष धोरणाच्या प्रश्नावर राज्य समिती, आपण स्वत: होऊन अगर त्या राज्यातल्या एकूण पक्ष सभासदांचा तिसरा हिस्सा असलेल्या सभासदांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या जिल्हा समित्यांच्या मागणीवरून, मध्यवर्ती समितीच्या संमतीने पक्षांतर्गत चर्चा सुरू करू शकेल.

४. पक्षांतर्गत चर्चा मध्यवर्ती समितीच्या मार्गदर्शनाखाली चालविली जाईल. चर्चेसाठी घेतलेल्या प्रश्नांची मांडणी मध्यवर्ती समिती करील व चर्चा चालविण्याची पद्धत तीच ठरवून देईल.

राज्य समिती जेव्हा अशी चर्चा सुरू करते, तेव्हा ती मध्यवर्ती समितीच्या संमतीने चर्चेसाठी घेतलेल्या प्रश्नांची मांडणी करू शकते आणि चर्चा चालविण्याची पद्धत ठरवू शकते.

## कलम २२ : पक्ष काँग्रेस व परिषदांच्या तयारीसंबंधीची चर्चा

१. पक्ष काँग्रेसच्या दोन महिने अगोदर, मध्यवर्ती समिती पक्षाच्या सर्व घटकांनी चर्चा करण्यासाठी ठरावाचा मसुदा प्रसृत करील. मध्यवर्ती समितीने ह्या ठरावाचा मसुदा प्रसृत केल्यावर शक्य तेवढ्या कमी वेळात त्याचे त्या त्या राज्यात भाषांतर करणे आणि त्याच्या आवश्यक तेवढ्या प्रती सर्व शाखा समित्यांना पाठविणे, हे कार्य राज्य समित्यांवर बंधनकारक राहील. ठरावावरील उपसूचना थेट मध्यवर्ती समितीकडे पाठविल्या जातील व ती पक्ष काँग्रेसपुढे ह्या उपसूचनांवरील आपला अहवाल मांडील.

२. प्रत्येक पातळीवरील पक्ष परिषद संबंधित समितीने मांडलेले अहवाल आणि ठराव यांच्या आधारावर भरेल.

## कलम २३ : जनसंघटनांमध्ये कार्य करणारे पक्ष सभासद

जनसंघटना व त्यांच्या कार्यकारिणींमध्ये काम करणारे पक्ष सभासद स्वत:ला फ्रॅक्शन वा फ्रॅक्शन समित्यांमध्ये संघटित करून, योग्य त्या पक्ष समितीच्या मार्गदर्शनाखाली कार्य करतील. त्यांनी त्या जनसंघटनांचे ऐक्य, जनआधार व संघर्षक्षमता ही बळकट करण्याकरता सतत झटले पाहिजे.

## कलम २४ : उपनियम

मध्यवर्ती समिती, पक्ष घटनेबरहुकूम व तिच्याशी सुसंगत असे नियम व उपनियम बनवू शकेल. राज्य समित्याही मध्यवर्ती समितीच्या मान्यतेने पक्ष घटनेबरहुकूम व तिला सुसंगत असे नियम व उपनियम बनवू शकतील.

## कलम २५ : दुरुस्ती

केवळ पक्ष काँग्रेसच पक्ष घटनेत दुरुस्ती करू शकेल. घटना दुरुस्तीच्या प्रस्तावांची पूर्वसूचना पक्ष काँग्रेसच्या दोन महिने अगोदर दिली जाईल.

***(अनुवाद : कॉ. पी. बी. रांगणेकर)***

❑❑❑



# पक्ष घटनेखालील नियम

**(८-१० एप्रिल १९८८च्या मध्यवर्ती समितीच्या बैठकीत मंजूर केलेले)**

## कलम ४, पोटकलम १० : पक्ष सभासदत्व

**पक्ष सभासदाची एका घटकातून दुसऱ्या घटकामध्ये अथवा एका राज्यातून दुसऱ्या राज्यामध्ये बदली करण्याबाबत :**

(खुलासा : प्रत्यक्षात एका राज्यातून दुसऱ्या राज्यात होणाऱ्या बदल्या मध्यवर्ती समितीमार्फत होत असल्या, तरी या बाबतीत पुरविण्यात येणारा तपशील साधारणत: अपुरा असतो. म्हणून एखादी राज्य समिती जेव्हा एखाद्या कॉम्रेडची दुसऱ्या राज्यात बदली करण्याची विनंती मध्यवर्ती समितीला करते, तेव्हा तिने प्रत्येक पातळीवर प्रत्येक पक्ष सभासदाचा योग्य रेकॉर्ड ठेवून पुढील बाबींचा त्यात स्पष्ट उल्लेख केला पाहिजे. हीच बाब राज्यांतर्गत बदलीलाही लागू आहे.)

**नियम : सभासदत्वाची बदली**

१) बदली करण्यासंबंधीच्या पत्रासोबत पुढील तपशील दिला गेलाच पाहिजे :

कॉम्रेडचे नाव

वय

पक्षात कोणत्या वर्षी दाखल?

तो किंवा ती कोणत्या पक्षघटकात होती?

तो किंवा ती कोणत्या जनसंघटनेत काम करत होती?

मासिक लेव्हीची रक्कम किती व ती केव्हापर्यंत दिली गेली आहे?

शिस्तभंगविषयक कारवाई केली असल्यास त्याची माहिती :

कोणत्या राज्यातून त्याची अथवा तिची बदली व्हावयाची आहे?

कोणत्या राज्यात त्याची अथवा तिची बदली करावयाची आहे?

पक्ष सभासदत्वाच्या नूतनीकरणाचे वर्ष :

त्याच्याशी अथवा तिच्याशी संपर्क साधावयाचा पत्ता :

**सहाय्यक गट :** (खुलासा : जनआंदोलनांतून पुढे आलेल्या लढाऊ कार्यकर्त्यांना पक्ष सभासद म्हणून भरती करून घेण्यासाठी सहाय्यक गटांमध्ये त्यांचा समावेश करून त्यांचे शिक्षण आणि प्रशिक्षण करावे असा आदेश साल्किया प्लेनमने दिला होता. त्यासाठी नियमांत तरतूद केली पाहिजे.)

१) जनआंदोलनात व जनसंघटनांत सक्रियपणे सहभागी होणाऱ्या लढाऊ कार्यकर्त्यांना सहाय्यक गटांमध्ये संघटित करण्यासाठी पक्ष घटकांनी पावले उचलली पाहिजेत. हे सहाय्यक गट व्यापक स्वरूपाच्या पक्ष सहानुभूतीदारांचे गट असतात.

२) पक्ष समित्यांनी अशा सहाय्यक गटांतील सभासदांना पक्ष कार्यक्रम आणि मूलभूत धोरणे या संबंधीचे शिक्षण आणि प्रशिक्षण देण्याची व्यवस्था करावी. त्यामुळे योग्य वेळात त्यांची उमेदवार सभासद म्हणून पक्षात दाखल होण्याकरता तयारी होईल.

## कलम ६ : पक्ष सभासदत्वाचे रेकॉर्ड्स

**नियम :** पक्ष सभासदांचे रेकॉर्ड जिल्हा समितीच्या देखरेखीखाली ठेवले जावे अशी पक्ष घटनेत तरतूद आहे. हे रेकॉर्ड अचूक असणे आणि त्यांची अधिकृत प्रत व्यवस्थितपणे ठेवणे, या बाबतीतील अखेरचा अधिकार जिल्हा समित्यांचा असला तरी संबंधित राज्य समितीने तसा निर्णय घेतल्यास हे रेकॉर्ड्स व्यवस्थित ठेवण्याचे कार्य त्या राज्यात जिल्हा वा प्रदेश यांच्यामधील अथवा स्थानिक समितीकडे सोपविले जाऊ शकते.

## कलम ७ : पक्ष सभासदत्वाची तपासणी

(खुलासा : पोटकलम (१) मध्ये म्हटल्याप्रमाणे 'एखादा पक्ष सभासद सतत काही काळ आणि योग्य कारण न देता पक्षाच्या जीवनात व कार्यात भाग घेण्यास किंवा पक्षाची वर्गणी-लेव्ही भरण्यास चुकला असेल, तर त्याला पक्ष सभासदत्वातून गाळले जाईल.' घटनेने या संबंधात जी योग्य कारणे दिली आहेत, त्यांचे पालन न करता मनमानी तऱ्हेने कोणास सभासदत्वातून गाळले जाऊ नये, याची दक्षता घेण्यासाठी ही तरतूद आहे. या बाबतीतील प्रक्रियेसंबंधी काही निश्चित नियम करणे आवश्यक आहे.)



**नियम :** १) ज्या पक्ष घटकाला एखाद्या सभासदाला गाळावयाचे असेल, त्याने त्याला अथवा तिला प्रथम आपल्या भूमिकेबाबत खुलासा करण्याची संधी दिलीच पाहिजे. त्या सभासदाला गाळण्याचा निर्णय शाखेने निकटच्या वरिष्ठ कमिटीला लेखी कळविला पाहिजे.

२) वरिष्ठ समितीने पक्ष सभासदसंख्येला मंजुरी देत असताना व त्याची नोंदणी करीत असताना गळत्यांची यादी तपासलीच पाहिजे आणि त्यावरील आपले निश्चित मत दिलेच पाहिजे.

३) संबंधित समित्यांनी पक्ष सभासद नोंदणी, गळत्या, बदल्या व सभासदांचे वर्गीकरण, यांचा तपशील देऊन नूतनीकरणाबाबतचा आपला अहवाल निकटच्या वरिष्ठ समितीला सादर केलाच पाहिजे.

४) पक्ष सभासद नूतनीकरणासाठी एक फॉर्म असला पाहिजे. संबंधित सभासदाने प्रत्येक वर्षी हा भरावयाचा असतो. त्यात वय, कोणत्या वर्षी पक्षात दाखल, उत्पन्न, कोणत्या आघाडीवर कार्य इ. मूलभूत माहितीचा समावेश असला पाहिजे.

५) पक्ष सभासदत्वाच्या वर्गणीची पावती संबंधित सभासदाला दिलीच पाहिजे.

६) एखाद्या सभासदाला पक्षातून वगळण्यात आल्याचा निर्णय संबंधित पक्ष शाखेने निर्णय घेतल्यापासून ३० दिवसांच्या आत संबंधित पक्ष सभासदाला कळवला पाहिजे.

७) पक्षातून वगळण्याच्या निर्णयाविरोधातील अपील संबंधित कॉम्रेडने वगळण्यात आल्याचा निर्णय कळल्यापासून ३० दिवसांच्या आत केले पाहिजे.

## कलम ९ : सभासदत्वाची वर्गणी

**नूतनीकरण :** (खुलासा : कलम ९ पोटकलम १ मध्ये म्हटल्याप्रमाणे पक्षाची वार्षिक वर्गणी 'संबंधित सभासदाने दरवर्षी मार्च महिना संपण्यापूर्वी शाखा अथवा घटक सेक्रेटरीला' द्यावयाची असते.

सभासदत्वाची वर्गणी मार्च अखेरपर्यंत पक्ष घटकाकडे द्यावयाची असल्यास

ती वर्गणी जिल्हा/राज्य समितीकडे पोहोचण्यास वेळ लागतो. म्हणून व्यवहारात आज राज्यांकडून सभासदत्वाची संकलित वर्गणी मध्यवर्ती समितीला वेगवेगळ्या वेळी मिळते. याची कालमर्यादा एप्रिलपासून अगदी डिसेंबरपर्यंतही असते. यासाठी सभासद वर्गणी केंद्राला पोहोचण्याबाबत एक विभाजन तारीख ठरविणे आवश्यक आहे.)

**नियम :** १) दरवर्षी पक्ष सभासदत्वाचे नूतनीकरण ३१ मार्चपर्यंत पूर्ण झालेच पाहिजे.

२) राज्य समित्यांनी दरवर्षी सभासदत्वाची वर्गणी केंद्राकडे ३१ मेपर्यंत पाठवलीच पाहिजे.

३) काही खास अडचण आल्यास मध्यवर्ती समिती/पॉलिटब्यूरोच ही मुदत वाढवू शकतो.

४) चालू वर्षातील उमेदवार सभासदांच्या नूतनीकरणाची वर्गणी वर्ष अखेरपर्यंत (३१ मार्च) किंवा त्यापूर्वी पाठविली पाहिजे.

**टीप :** उमेदवार सभासदांची नवीन भरती (नूतनीकरणाचा काळ संपल्यानंतर) वर्षभर चालू रहाते. त्यांची फी मध्यवर्ती समितीला वेगळी दिली गेली पाहिजे.

## कलम १० : पक्ष लेव्ही

**१) पक्ष सभासदांच्या लेव्हीचे दर :** पक्ष सभासदांकडून जमवावयाच्या लेव्हीचे दर मध्यवर्ती समिती पुढीलप्रमाणे ठरवीत आहे.

| **उत्पन्न** | **लेव्हीचे दर** |
|---|---|
| १) रु. ३०० पर्यंत | २५ पैसे |
| २) रु. ३०१ ते रु. ५०० | ५० पैसे |
| ३) रु. ५०१ ते रु. १००० | १/२ टक्का |
| ४) रु. १००१ ते रु. ३००० | १ टक्का |
| ५) रु. ३००१ ते रु. ५००० | २ टक्के |
| ६) रु. ५००१ ते रु. ७००० | ३ टक्के |
| ७) रु. ७००१ ते रु. ८००० | ४ टक्के |
| ८) रु. ८००० पेक्षा अधिक | ५ टक्के |



२) सभासदाची लेव्ही त्रैमासिक अथवा वार्षिक असली तर त्याची मासिक कमाई किती हे त्याच्या वार्षिक कमाईच्या आधारावर ठरवावे आणि वरील नियमाप्रमाणे त्याने द्यावयाची लेव्ही निश्चित करावी.

३) एखाद्या सभासदाचा पती/पत्नी अथवा कुटुंबातील अन्य सदस्य स्वत:च्या कमाईने कुटुंबाच्या कमाईत भर घालत असल्यास, तो अथवा ती पक्ष सभासद नसल्यास, लेव्ही आकारताना त्यांची कमाई वरील नियमाप्रमाणे जमेस धरली जाणार नाही.

**टीप :** १) नोकरी करणारे कर्मचारी व वेतन कमावणारे यांच्या बाबतीत त्यांची एकूण ठोस कमाई, महागाईभत्ता आणि इतर भत्ते जमेस धरून म्हणजे त्यांचे उत्पन्न होय. या व्यतिरिक्त त्या सभासदाला जमीनजुमला, व्यापार-उदीम, घरांचे भाडे इ. काही कमाई असेल तर ती त्याच्या एकूण उत्पन्नात जमेस धरावी.

२) शेतकऱ्यांच्या बाबतीत शेती उत्पन्नासाठी खर्च करावी लागणारी प्रत्यक्ष रक्कम वजा जाता राहिलेली त्याची कमाई समजावी.

३) एखादा सभासद संयुक्त कुटुंबाच्या कमाईवर राहत असेल, तर त्या उत्पन्नातील त्याचा वाटा हे त्याचे उत्पन्न समजावे.

४) एखाद्या आत्यंतिक प्रकरणामध्ये - बेरोजगारी, अवर्षण अथवा आजार असल्यास, लेव्हीमध्ये सूट देण्याविषयीचा निर्णय संबंधित राज्य समितीने घ्यावयाचा आहे.

## कलम १५, पोटकलम १० : मध्यवर्ती समितीचा निधी

**नियम :** १) आपल्या मालमत्तेची व्यवस्था पाहण्यासाठी एक विश्वस्त मंडळ नेमण्याचा अधिकार मध्यवर्ती समितीला आहे.

२) पक्षाची केंद्रीय यंत्रणा चालविण्यासाठी लागणाऱ्या पक्षनिधीला अथवा विशेष पक्ष निधीला प्रत्येक राज्याने किती रक्कम द्यावयाची हे मध्यवर्ती समिती दरवर्षी, अथवा जेव्हा गरज लागेल तेव्हा, ठरवते.

३) पॉलिटब्यूरो एक निधी उपसमिती नेमते. ही उपसमिती आपली बैठक बोलावून :

अ) निधीच्या बाबतीत तसेच फक्त रु. १०,००० पर्यंत रक्कम खर्च करण्याच्या बाबतीत निर्णय घेते. याहून जास्त रक्कम खर्च करण्याबाबतचा निर्णय पॉलिटब्यूरोसमोर ठेवला जाईल.

ब) निधी उपसमिती मध्यवर्ती समितीचे व तिच्या एकूण यंत्रणेचे त्रैमासिक हिशेब पॉलिटब्यूरोसमोर मांडील.

क) घटनेत घालून दिल्याप्रमाणे निधी उपसमिती पॉलिटब्यूरोने मंजूर केलेले वार्षिक हिशेब मध्यवर्ती समितीसमोर तिच्या मंजुरीसाठी ठेवील.

ड) उपसमितीच्या एका सभासदाकडे पक्षनिधीचे उत्पन्न आणि त्याचे वाटप यांची जबाबदारी सोपविली जाईल. नंतर हा तपशील हिशेबाची जबाबदारी असलेल्या सभासदाकडे त्या संबंधीच्या सर्व बाबी पूर्ण करण्यासाठी आणि हिशेब लिहिण्यासाठी दिला जाईल.

इ) पक्ष मुखपत्रांचे आणि (असल्यास) इतर यंत्रणांचे सहा महिन्यांचे हिशेब या उपसमितीला सादर करावयाचे असतात.

## कलम १६, पोटकलम ३(ब) : राज्य व जिल्हा पक्ष संघटनांनी स्थापन करावयाच्या मधल्या समित्या

(खुलासा : पोटकलम ३ (ब) मध्ये म्हटल्याप्रमाणे 'प्राथमिक घटक (शाखा) आणि जिल्हा वा प्रदेश यांच्यामधील निरनिराळ्या पक्ष संस्थांबाबत राज्य समिती निर्णय घेईल आणि त्यांच्या रचनेबाबत व कामकाजाबाबत आवश्यक ती तरतूद करील. मध्यवर्ती समितीने घालून दिलेल्या नियमांना अनुसरूनच हे केले जाईल.')

प्राथमिक घटक आणि जिल्हा अथवा प्रदेश समिती यांच्यामध्ये अशा समित्या स्थापन करण्याचा निर्णय राज्य समिती पुढील नियमांनुसार घेऊ शकते.

अ) स्थापन करावयाच्या समित्यांच्या आकार राज्य समिती ठरवते.

ब) अशी समिती त्या पातळीवरील प्रतिनिधींची परिषद निवडील. या समितीने एक सचिव आणि/किंवा सचिवमंडळ निवडावे.



क) मधल्या समितीच्या परिषदेला निवडावयाच्या प्रतिनिधींबाबतचे निकष राज्य समिती ठरवील.

ड) स्थानिक, विभाग, प्रदेश, इ. समित्या राज्य/जिल्हा समित्यांसाठी सुचविलेली सर्व कार्ये पार पाडतील. त्यांचे कार्य त्यांच्या अधिकारक्षेत्रातील स्थानिक विभाग अथवा प्रदेश यापुरतेच मर्यादित राहील.

इ) अस्थायी अथवा नेमणुकीच्या पायावर, सुसूत्रीकरणाच्या उद्देशाने, स्थापन केलेल्या समित्यांना निवडून दिलेल्या समित्यांचे सर्वसाधारण अधिकार नसतील. ज्या संबंधित समित्यांनी त्यांची नेमणूक केली असेल, त्यांच्या निर्णयांबरहुकूम त्यांचे कामाचे क्षेत्र असेल.

फ) जिल्हा पक्ष परिषदा आणि त्यांच्या खालील परिषदांना प्रतिनिधी किती असावेत हे राज्य समिती ठरवील.

## कलम १६ : मध्यवर्ती समितीखालील समित्यांसाठी पक्ष निधी व हिशेबासंबंधीचे नियम

(खुलासा : मध्यवर्ती समितीचा निधी आणि हिशेब या संबंधातील नियमांप्रमाणेच असलेले पुढील नियम मध्यवर्ती समितीच्या खालील सर्व निवडलेल्या समित्यांना लागू असतील.)

अ) राज्य स्तरावर (आणि राज्य समितीच्या निर्णयाप्रमाणे स्थापलेल्या मधल्या/जिल्हा कमिट्यांसाठी) राज्य सचिवमंडळ पक्षनिधी उपसमिती नेमील.

ब) ही उपसमिती सचिवमंडळाच्या देखरेखीखाली पैशाचे वितरण करणे व हिशेब ठेवणे याला जबाबदार राहील.

क) ही उपसमिती पक्ष समितीला सहा महिन्यांचे हिशेब सादर करील. हे हिशेब नजिकच्या वरिष्ठ समितीला पाठविले पाहिजेत.

ड) या उपसमितीने वार्षिक हिशेब तपासून पक्ष समितीसमोर ते मंजुरीसाठी ठेवले पाहिजेत.

इ) उपसमितीने तपासलेल्या राज्य समितीच्या वार्षिक हिशेबाची एक प्रत राज्य समिती मध्यवर्ती समितीला पाठवील.

फ) जिल्हा समितीने जिल्हा व त्याखालील निवडून आलेल्या समित्यांचे एकत्रित हिशोबपत्रक चार्टर्ड अकौंटंटकडून प्रमाणित करून घेऊन राज्य समितीला दर वर्षी ३१ जुलैपूर्वी सादर केलेच पाहिजे

ग) राज्य समितीने राज्य व त्याखालील निवडून आलेल्या सर्व समित्यांचे एकत्रित हिशोबपत्रक चार्टर्ड अकौंटंटकडून प्रमाणित करून घेऊन मध्यवर्ती समितीला दर वर्षी ३१ ऑगस्टपूर्वी सादर केलेच पाहिजे

## कलम १८ : मध्यवर्ती नियंत्रण आयोगाच्या कार्यपध्दतीबाबतचे नियम

१) कलम १८ खाली एखादे प्रकरण वा अपील आल्यास, मध्यवर्ती नियंत्रण आयोग त्या प्रश्नावर निर्णय घेण्यासाठी त्याची तपासणी करील.

२) ज्या पक्ष सभासदाला आपल्यावर अन्याय झाला आहे असे वाटते, त्याच्याव्यतिरिक्त अन्य कोणीही केलेले अपील विचारात घेतले जाणार नाही.

३) एखाद्या प्रकरणाची शहानिशा करून निष्कर्ष काढण्यासाठी मध्यवर्ती नियंत्रण आयोगाला संबंधित पक्ष घटक वा व्यक्तीशी थेट पत्रव्यवहार करण्याचा व त्याची तपासणी करण्याचा अधिकार असेल.

४) मध्यवर्ती नियंत्रण आयोगाची बैठक सर्वसाधारणत: तीन महिन्यांतून एकदा होईल. चौदा दिवसांची पूर्वसूचना देऊन अध्यक्ष मध्यवर्ती नियंत्रण आयोगाची बैठक बोलावील.

५) आयोगाचे बहुसंख्य सदस्य हजर असल्यास बैठकीचा कोरम पूर्ण होईल. सर्व सभासदांचे एकमत झाल्यास अथवा बहुसंख्य सदस्यांचे बहुमत झाल्यास मध्यवर्ती नियंत्रण आयोग एखादा निर्णय घेऊ शकेल. घेतलेला निर्णय गैरहजर सदस्याला अथवा सदस्यांना कळविला जाईल.

६) सोप्या वा गुंतागुंत नसलेल्या प्रश्नांवर सभासदांनी एकमेकांशी केलेली सल्लामसलत वा पत्रव्यवहाराव्दारे मध्यवर्ती नियंत्रण आयोग निर्णय घेऊ शकेल.

७) मध्यवर्ती नियंत्रण आयोग आपला निर्णय अपील करणाऱ्या सभासदाला आणि संबंधित राज्य समितीला कळवील आणि संबंधित समित्या त्या



ताबडतोब अंमलात आणतील.

८) मध्यवर्ती नियंत्रण आयोग आपल्या कार्याचा व निर्णयांचा एकत्रित केलेला अहवाल मध्यवर्ती समितीला वर्षातून किमान एकदा सादर करील.

९) वरील नियम राज्य नियंत्रण आयोगांनाही त्यांच्या कार्यक्षेत्रात लागू असतील.

## मध्यवर्ती नियंत्रण आयोगाचे काम चालविण्याबाबतीतील नियम

१) अपील हाती येताच मध्यवर्ती नियंत्रण आयोगाचा अध्यक्ष त्यासंबंधीची माहिती इतर सभासदांना पुरवील.

२) त्या विशिष्ट प्रकरणाची चौकशी सुरू करण्याकरता तत्काळ काय पावले उचलली पाहिजेत त्याबाबतच्या सूचनाही अध्यक्ष करील. त्या प्रकरणासंबंधी मध्यवर्ती नियंत्रण आयोगाचे इतर सभासदही आपल्या सूचना पाठवतील.

३) अपीलावर निर्णय घेण्यासाठी संबंधित समित्यांकडून आणि सभासदांकडून आवश्यक असलेली सर्व माहिती मागवून घेण्याचा मध्यवर्ती नियंत्रण आयोगाला अधिकार असेल. अशी माहिती दोन महिन्यांच्या मुदतीत पुरविली गेली पाहिजे आणि या काळात जर ती माहिती पुरविली गेली नाही तर मध्यवर्ती नियंत्रण आयोग त्या प्रकरणात पुढील पावले उचलेल.

## कलम १९, पोटकलम १३ : पक्ष शिस्त

अपवादात्मक परिस्थितीमध्ये पक्षातून तडकाफडकी काढून टाकण्याची तरतूद ही 'अतिशय गंभीर' अशा पक्षविरोधी कारवायांबाबत आहे. याचा अर्थ, जेव्हा एखादा सभासद हेर अथवा शत्रूचा हस्तक असल्याचे आढळून येते, अथवा त्या सभासदाच्या कृतीमुळे पक्षाच्या भूमिकेला गंभीर स्वरूपाची हानी पोहोचते, अशा अत्यंत गंभीर परिस्थितीमध्येच ही तरतूद लागू केली जावी.

१) पक्ष शाखेने शिस्तभंगाखाली केलेल्या कारवाईची माहिती संबधित पक्ष सभासदाला कारवाईच्या निर्णयाच्या ३० दिवसांच्या आत कळविली पाहिजे, किंवा कलम १९च्या पोटकलम ७ नुसार वरच्या समितीने शिक्कामोर्तब करण्याची गरज असल्यास असे शिक्कामोर्तब केल्यानंतर ३० दिवसांच्या

आत संबंधित पक्ष कार्यकर्त्याला ती कळविली पाहिजे.

२) शिस्तभंगाखाली केलेल्या कारवाईविरोधातील अपील संबंधित पक्ष सभासदाने कारवाईचा निर्णय कळल्यापासून सहा महिन्यांच्या आत केले पाहिजे.

## कलम २० : लोकनियुक्त संस्थांमधील पक्ष सभासद

**नियम :** १) मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या प्रत्येक संसद सदस्याने मध्यवर्ती समिती ठरवील ती लेव्हीची रक्कम मध्यवर्ती समितीला भरावयाची असते.

२) पॉलिटब्यूरोने ठरविलेल्या लेव्हीच्या प्रमाणाचा राज्याचा वाटा (तो सदस्य ज्या राज्याचा असेल) त्या राज्य समितीला दर महिन्याला पाठविला जाईल.

(खुलासा - घटना कलम २०, पोटकलम ५ मध्ये म्हटल्याप्रमाणे, विधीमंडळांतील आणि स्थानिक संस्थांतील कम्युनिस्ट सदस्यांना मिळणारे वेतन व भत्ते हा पक्षाचा पैसा मानला जातो. यापूर्वी खासदार-आमदार यांना निवृत्ती वेतन देण्याची तरतूद नव्हती. आता ती आहे, म्हणून पुढील नियम.)

३) विधीमंडळांतील आणि स्थानिक संस्थांतील कम्युनिस्ट सदस्यांना मिळणारे वेतन आणि भत्ते यात, त्यांना मिळत असल्यास, निवृत्ती वेतनाचाही समावेश होईल.

## कलम २२ : पक्ष काँग्रेस आणि परिषदांच्या तयारीबाबत चर्चा

१) पक्ष परिषदांच्या व्यासपीठांचा उपयोग, गेल्या पक्ष परिषदेपासून कामाचा अहवाल आणि गेली पक्ष परिषद/पक्ष काँग्रेसने घालून दिलेल्या धोरणाच्या कार्यवाहीसंबंधीचे राजकीय-संघटनात्मक प्रश्न यांची चर्चा आणि आढावा घेण्यासाठी केला जाईल. पक्ष काँग्रेससमोरील राजकीय ठरावाच्या मसुद्यावरील चर्चा घालून दिलेल्या तरतूदीनुसार वेगळी केली जाईल.

## कलम २३ : जनसंघटनांमध्ये कार्य करणारे पक्ष सभासद

१) वेगवेगळ्या जनआघाड्यांवर काम करणाऱ्या पक्ष सभासदांच्या कार्यात त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी केंद्रीय, राज्य आणि जिल्हा पातळ्यांवरील पक्ष समित्यांनी आपल्या सभासदांमधील काही सभासद, तसेच इतर सक्षम समजले जाणारे सभासद, यांच्या उपसमित्या (सब-कमिट्या) स्थापाव्यात. ह्या उपसमित्या त्या आघाडीवरील प्रश्नांबाबत सर्व माहिती मिळवतील, तेथे होणाऱ्या पक्षबांधणीची तपासणी करतील आणि वेगवेगळ्या जनसंघटनांमधील पक्ष सभासद, मग ते पक्ष घटक असोत वा फ्रॅक्शन समित्या असोत, त्यांना मार्गदर्शन करणे आणि त्यांच्या कार्यात सुसूत्रीकरण आणणे, तसेच त्या जनसंघटनांमध्ये पक्षाच्या धोरणाची अंमलबजावणी आणि पाठपुरावा होत असल्याचे पाहणे, ही कामे करतील.

२) एखाद्या जनसंघटनेत काम करणारे सर्व पक्ष सभासद अथवा त्या संघटनेच्या वेगवेगळ्या पातळ्यांवर निवडून दिलेल्या संस्थांमध्ये असलेले पक्ष सभासद हे त्या संघटनेचे पक्ष फ्रॅक्शन असेल. त्यांनी संबंधित पक्ष समितीच्या मार्गदर्शनाखाली आणि निर्णयाप्रमाणे कार्य करावयाचे असते.

३) एखाद्या जनसंघटनेत वेगवेगळ्या पातळ्यांवर कार्य करत असलेले सभासद मोठ्या संख्येने असले तर तेथील फ्रॅक्शन सभासदांकडून फ्रॅक्शन समित्या मोठ्या संख्येने बनवल्या पाहिजेत. संबंधित पक्ष समिती अशी फ्रॅक्शन समिती बनवील. त्या फ्रॅक्शन समितीमध्ये त्या पक्ष समितीचे काही सभासद असल्यास ते व त्यांच्या व्यतिरिक्त, पक्ष समितीच्या मते आवश्यक ती परिपक्वतेची पातळी असलेले अथवा जनआंदोलनांचा अनुभव असलेले कॉम्रेड्स यांचा समावेश असेल.

४) वरीलप्रमाणे घडविलेल्या फ्रॅक्शन समितीने त्या विशिष्ट जनसंघटनेच्या कार्यकारिणीमध्ये अथवा जनरल कौन्सिलमध्ये संबंधित पक्ष समितीचे निर्णय पार पाडले पाहिजेत. त्या पक्ष समितीचे निर्णय त्या फ्रॅक्शनच्या सभासदांनी अंमलात आणण्यासाठी फ्रॅक्शन समितीने आवश्यक ते सर्व उपाय योजावेत.

***(अनुवाद : कॉ. पी. बी. रांगणेकर)***

❑❑❑

# पक्षाच्या केंद्रीय समितीचे महत्त्वाचे संघटनात्मक निर्णय

१४ ते १६ डिसेंबर २००५ दरम्यान झालेल्या पक्षाच्या केंद्रीय समितीच्या बैठकीत १८व्या पक्ष काँग्रेसमध्ये झालेले निर्णय अंमलात आणण्यासाठी खालील महत्त्वाचे संघटनात्मक निर्णय घेण्यात आले.

## (१) शाखा कार्यपद्धती

**राज्य समित्यांनी शाखांची कार्यपद्धती सुधारण्याच्या दृष्टीने खालील मार्गदर्शक सूत्रांच्या आधारे ठोस कार्यक्रम आखावेत :**

१. शाखांच्या बैठकीचे नियमित आयोजन व्हावे. वर्षाकाठी किमान १२ बैठका प्रत्येक पक्ष शाखेने आयोजित केल्याच पाहिजेत.

२. शाखेच्या कार्यपद्धतीचा वार्षिक आढावा पक्ष नूतनीकरणाच्या वेळेस वरिष्ठ समितीकडून घेतला गेला पाहिजे.

३. शाखा सेक्रेटरींच्या सभा ठराविक कालावधीत जिल्हा समित्यांनी आयोजित केल्या पाहिजेत.

४. शाखेच्या विविध उपक्रमांत तिचे नेतृत्व करण्यासाठी शाखा सचिवांनी राजकीय व संघटनात्मकदृष्ट्या सक्षम व्हावे यासाठी जिल्हा समित्यांनी ठोस प्रशिक्षणाचे कार्यक्रम तयार केले पाहिजेत.

५. शाखांनी पक्ष सभासदांना विविध जनसंघटनांमध्ये काम वाटून देऊन त्यांच्या कामगिरीचा वेळोवेळी आढावा घेतला गेला पाहिजे.

६. शाखांनी आपल्या उपक्रमांचा वार्षिक कार्यक्रम तयार केला पाहिजे.

## (२) सहाय्यक गट

**सहाय्यक गटांची स्थापना व त्यांची कार्यपद्धती यासंबंधीची मार्गदर्शक सूत्रे पुढीलप्रमाणे :**

१. उमेदवार सभासद सहाय्यक गटातूनच भरती केले गेले पाहिजेत.

२. दोन रुपयांची प्रवेश फी सहाय्यक गट सभासदांकडून घ्यावी. लेव्हीऐवजी



त्यांच्याकडून देणगी घ्यावी.

३. कमीत कमी सहा महिन्यांच्या कालावधीनंतरच सहाय्यक सभासदाची उमेदवार सभासद म्हणून भरती केली जावी.

४. महत्त्वाच्या संघर्षांच्या व उपक्रमांच्या वेळेस सहाय्यक गटांची स्थापना केली जावी.

५. शाखा सचिव अथवा वरिष्ठ समितीचा सभासद किंवा सक्षम पक्ष सभासदाकडे सहाय्यक गटाच्या बैठका आयोजित करण्याची जबाबदारी द्यावी.

६. सहाय्यक गटाच्या नियमित बैठका आयोजित कराव्यात.

## (३) जिल्हा समित्या व शाखा यांमधील समिती

जर तीन किंवा जास्त पक्ष शाखा लगतच्याच परिसरात असतील तर जिल्हा समिती व शाखा यांच्यामध्ये एक स्थानिक समिती स्थापन करावी.

## (४) जिल्हा समित्या क्रियाशील व मजबूत बनविणे

पक्ष सभासदांना क्रियाशील बनविणे, त्यांचा स्तर उंचावणे, पक्ष शाखांची उपक्रमशीलता वाढविणे, पक्ष शाखांना स्थानिक प्रश्न व आंशिक मागण्या उचलण्याजोग्या बनविणे, जनसंघटनांना सामर्थ्यवान बनविणे या कार्यांसाठी जिल्हा समित्यांना क्रियाशील व मजबूत बनविणे अत्यावश्यक आहे. राज्य समितीने येत्या तीन वर्षांत ही कार्ये पार पाडण्यासाठी ठोस कार्यक्रम आखला पाहिजे.

## (५) पूर्णवेळ कार्यकर्ते

**पूर्णवेळ कार्यकर्त्यांच्या संदर्भात राज्य समिती व इतर समित्यांसाठी मार्गदर्शक सूत्रे पुढीलप्रमाणे :**

१. पक्षातील कोणत्याही पातळीवरील पूर्णवेळ कार्यकर्त्याची निवड पक्षाच्या समित्यांनी केली पाहिजे. इतर कोणत्याही स्थानिक समितीने ही निवड केली असली तरी जिल्हा समितीची त्यास मान्यता असावयास हवी. जिल्हा समितीने या संदर्भात झालेल्या निर्णयांची माहिती राज्य समितीला कळविली पाहिजे. पूर्णवेळ कार्यकर्त्याने खऱ्या अर्थाने पक्षाचे पूर्णवेळ काम केले पाहिजे.

मूलभूत वर्ग, महिला, दलित, आदिवासी व अल्पसंख्यांक यांमधून पूर्णवेळ कार्यकर्त्यांची भरती करण्यासाठी खास लक्ष दिले गेले पाहिजे.

२. निवड झालेल्या कार्यकर्त्याला संबंधित पक्ष समितीने केलेल्या संघटनात्मक योजनेप्रमाणे जबाबदारी दिली गेली पाहिजे.

३. राज्य समितीने पूर्णवेळ कार्यकर्त्यांच्या पुरेशा मानधनाबाबत मार्गदर्शक सूत्रे तयार केली पाहिजेत आणि हे मानधन नियमितपणे मिळण्याच्या दृष्टीने आवश्यक ती व्यवस्था केली पाहिजे.

४. संबंधित पक्ष समित्यांनी पूर्णवेळ कार्यकर्त्यांना त्यांच्या कामात मदत केली पाहिजे आणि पक्षाच्या राजकीय व संघटनात्मक धोरणाप्रमाणे पुढाकार घेण्यासाठी त्यांना प्रोत्साहित केले पाहिजे.

५. पूर्णवेळ कार्यकर्त्यांचा राजकीय व वैचारिक स्तर वाढविण्यासाठी जिल्हा व राज्य समित्यांनी राजकीय शिक्षण शिबिरे घेतली पाहिजेत.

६. संबंधित पक्ष समित्यांनी पूर्णवेळ कार्यकर्त्याच्या कामाची तपासणी करणे, त्यांचे अनुभव एकत्रित करण्यासाठी मदत करणे, त्यांच्या उपलब्धींना पुढे घेऊन जाणे आणि त्यांच्या चुका दुरुस्त करणे यासाठी योग्य ती व्यवस्था केली पाहिजे.

७. आजारपण, घरगुती व इतर अडचणी याबाबत पूर्णवेळ कार्यकर्त्यांना संबंधित पक्ष समित्यांनी मदत केली पाहिजे.

❑❑❑

भारताचा कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) हे भारताच्या कामगारवर्गाचे क्रांतिकारक अग्रदल आहे. कामगारवर्गाची सर्वाधिकारी सत्ता असलेले शासन स्थापन करून, त्यातून समाजसत्तावादाची व साम्यवादाची उभारणी करणे हे पक्षाचे ध्येय आहे. मार्क्सवाद-लेनिनवादाचे तत्त्वज्ञान आणि सिध्दांत हेच पक्षाला त्याच्या सर्व कार्यात मार्गदर्शक राहतील. कारण, मानवाद्वारा होणाऱ्या मानवाच्या पिळवणुकीचा अंत करण्याचा, श्रमिक जनतेची संपूर्ण मुक्ती करण्याचा अचूक मार्ग तिला दाखविणारे हे एकमेव तत्त्वज्ञान आहे. पक्ष सर्वहारावर्गीय आंतरराष्ट्रीयवादाची पताका उंच फडकवित ठेवतो.

पक्षाचा कार्यक्रम व घटना मानण्यास, पक्ष संघटनांपैकी एका संघटनेत काम करण्यास, पक्ष सभासद म्हणून द्यावयाची रक्कम (ठरलेली वर्गणी व लेव्ही) नियमितपणे भरण्यास आणि पक्षाचे निर्णय अंमलात आणण्यास तयार असलेली, भारतात राहणारी, अठरा वर्षे किंवा त्यावरील वयाची कोणतीही व्यक्ती पक्षाची सभासद होण्यास पात्र राहील.

पक्षात दाखल होणारी प्रत्येक व्यक्ती पक्ष प्रतिज्ञेवर सही करील. प्रतिज्ञा पुढीलप्रमाणे असेल :

''मी पक्षाचे ध्येय आणि उद्दिष्टे शिरोधार्य मानतो व त्याच्या घटनेचे पालन करण्याचे व त्याचे निर्णय एकनिष्ठपणे पार पाडण्याचे मान्य करतो.''

''मी कम्युनिझमच्या आदर्शांना उचित असे जीवन जगण्याची पराकाष्ठा करीन आणि पक्षाच्या व जनतेच्या हितापुढे स्वत:चे हित गौण लेखून कामगारवर्गाची, श्रमिक जनतेची व देशाची नि:स्वार्थपणे सेवा करीन.''

**- पक्ष घटनेमधून**

**प्रकाशक :** डॉ. अशोक ढवळे, सेक्रेटरी, महाराष्ट्र राज्य कमिटी, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष, जनशक्ती कार्यालय, पांडुरंग बुधकर मार्ग, वरळी, मुंबई - ४०० ०१३.

**दूरध्वनी :** (०२२) २४९५१५७६/२४९२६८४१ • **फॅक्स :** (०२२) २४९६१५२५

**मुद्रक :** न्यू एज प्रिंटिंग प्रेस, प्रभादेवी, मुंबई - ४०० ०२५.

**(जानेवारी २०११ : ५००० प्रती)**

# पक्ष घटना

## भारताचा कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी)

**महाराष्ट्र राज्य कमिटीचे प्रकाशन**

**किंमत ५ रुपये**

देशातील व महाराष्ट्रातील घटनांचे लोकशाही विश्लेषण
सामाजिक व आर्थिक न्यायाचा बिनतडजोड पुरस्कार
सत्ताधाऱ्यांच्या भ्रष्ट व जनताविरोधी कारभाराचे वस्त्रहरण
दलित-शोषित-कामकरी जनतेच्या लढ्यांशी बांधिलकी

**यांना वाहिलेले**

**मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या**
**महाराष्ट्र राज्य कमिटीचे साप्ताहिक मुखपत्र**

## ''जीवनमार्ग''

**वार्षिक वर्गणी - रु. २००** **आजीव वर्गणी - रु. २०००**

आपली वर्गणी बँक ड्राफ्ट/मनी ऑर्डरने आपल्या संपूर्ण पत्त्यासहित पाठवा :-
व्यवस्थापक, ''जीवनमार्ग'', जनशक्ती कार्यालय, पांडुरंग बुधकर मार्ग,
वरळी, मुंबई - ४०० ०१३.
फोन : (०२२) २४९५१५७६/२४९२६८४१
फॅक्स : (०२२) २४९६ १५ २५ इ-मेल : mahacpim@gmail.com

राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय प्रश्नांवर पक्षाची सुस्पष्ट वर्गीय भूमिका मांडणारी

**मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या**
**केंद्रीय कमिटीची साप्ताहिक मुखपत्रे**

**''लोकलहर'' (हिंदी)** **''पीपल्स डेमॉक्रसी'' (इंग्रजी)**

**पक्षाचे वैचारिक त्रैमासिक**

**''द मार्क्सिस्ट'' (इंग्रजी)**

**वार्षिक वर्गणी**

**''लोकलहर'' - रु. २००** **''पीपल्स डेमॉक्रसी'' - रु. २५०**
**''द मार्क्सिस्ट'' - रु. ६०**

आपली वर्गणी बँक ड्राफ्ट/मनी ऑर्डरने आपल्या संपूर्ण पत्त्यासहित पाठवा :-
मॅनेजर, ''लोकलहर/पीपल्स डेमॉक्रसी/द मार्क्सिस्ट''
१५, तालकटोरा मार्ग, नवी दिल्ली - ११० ००१.
फोन : (०११) २३७३८७२५

## मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाची उपलब्ध प्रकाशने

१. भारतीय स्वातंत्र्याची ६१ वर्षे : जीवनमार्ग विशेषांक - ५० रुपये
२. कॉ. शामराव आणि कॉ. गोदावरी परुळेकर - १० रुपये
३. महिलाविषयक प्रश्नांबाबत दृष्टिकोन आणि कार्ये - १० रुपये
४. अखिल भारतीय दलित हक्क संमेलनाचा ठराव - ०५ रुपये
५. पक्षसंघटनेविषयी मौलिक मार्गदर्शन - २० रुपये
६. पक्ष शाखांचे महत्त्व आणि शाखा सचिवांची कार्ये - ०५ रुपये
७. पक्ष कार्यक्रम - ०५ रुपये
८. पक्ष घटना - ०५ रुपये

## जनशक्ती प्रकाशनाची उपलब्ध प्रकाशने

१. भारताचा स्वातंत्र्यलढा आणि स्वातंत्र्योत्तर भारत
बी. टी. रणदिवे - ८० रुपये
२. मार्क्सवाद परिचयमाला
शिव वर्मा - ६० रुपये
३. खरा कम्युनिस्ट कसे बनावे?
लिऊ शाओ ची - ४० रुपये
४. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष - क्रांतीच्या दिशेने आगेकूच
प्रा. डॉ. विठ्ठल मोरे - ५० रुपये
५. स्मरणचित्रे : क्रांतिकारी शहिदांची
शिव वर्मा (अनुवाद : चित्रा बेडेकर) - ५० रुपये
६. शहीद भगतसिंग : आठवणी, विवेचन आणि विचार
संपादक : डॉ. अशोक ढवळे । डॉ. रमेशचंद्र पाटकर - ५० रुपये
७. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राचा लढा व डाव्या पक्षांचे योगदान
कृष्णा खोपकर - १० रुपये
८. सुवर्ण महोत्सवी महाराष्ट्र : सुवर्ण कोणाच्या खिशात?
डॉ. सुलभा ब्रह्मे - ५० रुपये
९. शिकवण भीमाची (भीम क्रांती गीते)
डॉ. आदिनाथ इंगोले - १० रुपये